**-: महाराष्ट्र शासन :-**

**नोंदणी व मुद्रांक विभाग**

**सह जिल्हा निबंधक वर्ग-१, पुणे शहर आणि सह जिल्हा निबंधक, पुणे ग्रामीण यांचे आस्थापनेवरील लिपीक-टंकलेखक, वाहनचालक व शिपाई संवर्गातील रिक्त पदे भरतीबाबत जाहिरात.**

---

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांजकडील शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१२/प्र.क्र.१८६/१२, दि.२५/७/२०१२ अन्वये शासकीय विभाग/ कार्यालयातील गट अ ते गट ड मधील सरळसेवा कोटयातील पदांपैकी, मंजूर पदांच्या प्रतिवर्षी कमाल ३ टक्के इतक्या कमाल मर्यादेपर्यंतच रिक्त पदे विहित कार्यपध्दतीने भरण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकाऱ्यांना राहणार आहेत. त्याचप्रमाणे शासन सामान्य प्रशासन विभाग यांजकडील शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०१२/प्र.क्र.१८६/१२, दि.२८/२/२०१३ मधील तरतुदीनुसार मागासवर्गीयांच्या अनुशेषाची गट क व गट ड संवर्गातील रिक्त पदे भरणेसाठीची ३ टक्केची अट शिथील करण्यांत आलेली आहे. तसेच उक्त शासन निर्णयानुसार ज्या संवर्गात मंजूर पदसंख्येनुसार सरळसेवा कोट्यात येणारी पदे ३५ वा त्यापेक्षा कमी आहेत त्या संवर्गातील पदे भरण्यासाठी ३ टक्केची कमाल मर्यादा शिथिल करण्यांत आलेली आहे.

त्यानुसार मा.नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,महाराष्ट्र राज्य, पुणे यांची त्यांचकडील पत्र दि.१५.०३.२०१३ नुसार विहित पध्दतीने भरती प्रक्रिया राबवून रिक्त पदे भरणेची कार्यवाही करणेबाबत कळविलेले आहे.

सह जिल्हा निबंधक वर्ग-१, पुणे शहर व पुणे ग्रामीण कार्यालयातील गट-क मधील लिपीक-टंकलेखक संवर्गातील २५ पदे, वाहनचालक संवर्गातील १ पद व गट-ड मधील शिपाई संवर्गातील १७ पदे भरण्याचे आयोजित करण्यात येत आहे. त्यानुसार संवर्गनिहाय, पदनिहाय तपशिल खालील तक्त्यात दर्शविण्यात आला आहे. त्यानुसार पात्र उमदेवारांकडून खालील अटीच्या अधीन राहून स्पर्धा परीक्षेसाठी (लेखी) महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित पुणे (Maharashatra Knowledge Corporation Ltd. (MKCL) Pune) यांच्या मार्फत अर्ज मागविणेत येत आहेत.

**-: सह जिल्हा निबंधक वर्ग-१, पुणे शहर व पुणे ग्रामीण कार्यालयाच्या आस्थापनेवरील संवर्ग निहाय भरावयाच्या पदांचा तपशील :-**

लिपीक-टंकलेखक संवर्ग (वेतनश्रेणी ६व्या वेतन आयोगाप्रमाणे ५२००-२०२०० पी.बी.-१, ग्रेड वेतन १९००)

| अ. क्र. | जातीचा प्रवर्ग | भरावयाची एकूण पदे | अपंग (३%) | अंशकालीन उमेदवार १०% | महिला ३०% | माजी सैनिक १५% | प्रकल्प ग्रस्त ५% | भुंकप ग्रस्त २% | खेळाडु ५% | इतर (समांतर आरक्षणा व्यतिरिक्त ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अ.जाती | ७ | ० | १ | ३ | १ | ० | ० | ० | २ |
| २ | अ.जमाती | ३ | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | २ |
| ३ | वि.जा.अ. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | भ.ज.ब. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ५ | भ.ज.क. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |

| अ. क्र. | जातीचा प्रवर्ग | भरावयाची एकूण पदे | अपंग (३%) | अंशकालीन उमेदवार १०% | महिला ३०% | माजी सैनिक १५% | प्रकल्प ग्रस्त ५% | भुंकप ग्रस्त २% | खेळाडु ५% | इतर (समांतर आरक्षणा व्यतिरिक्त ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | भ.ज.ड. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७ | विमाप्र | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ८ | इ.मा.व. | ७ | ० | ० | २ | १ | ० | ० | ० | ४ |
| ९ | खुला | ५ | १* (अस्थिव्यंग) | | २ | ० | ० | ० | ० | २ |
| | **एकूण** | **२५** | **१** | **१** | **८** | **२** | **०** | **०** | **०** | **१३** |

* एका पायाने किंवा दोन पायाने अस्थिव्यंग

वाहनचालक संवर्ग (वेतनश्रेणी ६व्या वेतन आयोगाप्रमाणे ५२००-२०२०० पी.बी.-१, ग्रेड वेतन- १९००)

| अ. क्र. | जातीचा प्रवर्ग | भरावयाची एकूण पदे | अंशकालीन उमेदवार १०% | महिला ३०% | माजी सैनिक १५% | प्रकल्प ग्रस्त ५% | भुंकप ग्रस्त २% | खेळाडु ५% | इतर (समांतर आरक्षणा व्यतिरिक्त ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सर्वसाधारण | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | **एकूण** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **१** |

शिपाई संवर्ग (वेतनश्रेणी ६व्या वेतन आयोगाप्रमाणे ४४४०-७४४०, ग्रे.पे. १३००)

| अ. क्र. | जातीचा प्रवर्ग | भरावयाची एकूण पदे | अपंग (३%) | महिला ३०% | माजी सैनिक १५% | प्रकल्प ग्रस्त ५% | भुंकप ग्रस्त २% | खेळाडु ५% | इतर (समांतर आरक्षणा व्यतिरिक्त ) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अ.जाती | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २ | अ.जमाती | २ | ० | १ | ० | ० | ० | ० | १ |
| ३ | वि.जा.अ. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | भ.ज.ब. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ५ | भ.ज.क. | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ६ | भ.ज.ड. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ७ | विमाप्र | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ८ | इ.मा.व. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| ९ | खुला | १३ | १** (अस्थिव्यंग) | ४ | २ | ० | ० | ० | ६ |
| | **एकूण** | **१७** | **१** | **५** | **२** | **०** | **०** | **०** | **९** |

** एका पायाने अस्थिव्यंग

(टिप :-१. उपरोक्त पदांची संख्या कमी-जास्त होण्याची शक्यता आहे.

२. वर नमूद केलेली पदसंख्या ही वर्षभरात रिक्त होणारी पदे विचारात घेऊन दर्शविण्यात आलेली आहेत. जशी जशी पदे रिक्त होतील त्या नुसार निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल.)

**-: इतर अटी :-**

१) समांतर आरक्षणानुसार माजी सैनिक, महिला इ. प्रवर्गातील उमेदवारांना देय असलेल्या सवलती देणेत येतील.

२) अंशकालीन कर्मचारी, स्वातंत्र्य सैनिकाचे नामनिर्देशित पाल्य उमेदवारांना देय असलेल्या सवलती देणेत येतील.

३) उक्त लिपीक-टंकलेखक संवर्गातील, वाहनचालक संवर्गातील व शिपाई संवर्गातील पदे पदोन्नतीने, सेवानिवृत्तीने, स्वेच्छा सेवानिवृत्तीने, राजीनामा, आंतरविभाग/ जिल्हा बदली तसेच मयत झालेने रिक्त झालेली आहेत. सदरची पदे भरणेसाठीची निवड यादी व प्रतिक्षा यादी १ वर्ष मुदतीसाठी किंवा पुढील सेवा भरतीची जाहीरात देणेत येईल त्या दिनांकापर्यंत या पैकी जो आधी घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राह्य ठरेल तद्नंतर ही निवड सुची व्यपगत होईल.

४) समांतर आरक्षणांतर्गत त्या-त्या प्रवर्गासाठी विहित केलेल्या टक्केवारीनुसार वाटा निश्चितपणे मिळणेसाठी त्या-त्या प्रवर्गातील उमेदवारांतून जागा भरणेत येतील.

५) सदरच्या जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या रिक्त पदांच्या संख्येत कमी / जास्त बदल होण्याची शक्यता आहे. काही अपरिहार्य कारणाने परीक्षा स्थगित झाल्यास त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परिक्षेचा प्रकार, पदांची संख्या, समांतर आरक्षण व सामाजिक आरक्षण याबाबत बदल करणे, परिक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अशंतः बदल करणे तसेच सेवाभरती प्रक्रियेत बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार पुणे जिल्हा निवड समिती, पुणे स्वतःकडे राखून ठेवीत आहे. भरती प्रक्रिये संदर्भात उद्‌भवणारे वाद, तक्रारी इत्यादीबाबत सदर समितीचा निर्णय अंतिम राहील.

६) माजी सैनिकांबाबत Government of India, Ministry of Personnel P. G. & Pensions (Department of Personnel & Training) No. ३६०३४/५/८५-Estt (SCT), New Delhi dt. २७th Oct १९८६ च्या राजपत्रात सैनिक दलात कार्यरत असताना १ वर्षा अगोदर माजी सैनिक या पदासाठी अर्ज करता येईल. तसेच तो गुणवत्तेनुसार पात्र ठरल्यास नियुक्तीचे अधिकार हे पुणे जिल्हा निवड समिती पुणे यांना राहतील.

७) अंध उमेदवाराने सर्वसाधारण प्रवर्गातून अर्ज केल्यास उमेदवारांने मदतनीसासाठी लेखी अर्ज करुन सह जिल्हा निबंधक वर्ग-१ पुणे शहर / ग्रामीण यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील.

८) वाहन चालक पदासाठी मोटार वाहन कायदा १९८८ नूसार जड वाहन अथवा मोटार कार अथवा जीप चालविण्याचा किमान ३ वर्षाचा अनुभवाचे प्रमाणपत्राची साक्षाकिंत प्रत निवड अंती सादर करणे आवश्यक आहे.

**अ) वयोमर्यादा (लिपीक-टंकलेखक, वाहनचालक तसेच शिपाई पदाच्या उमेदवारांना) :-**

उमेदवाराचे वय जाहिरातीच्या दिनांकास किमान १८ वर्षे पुर्ण तर खुल्या प्रवर्गासाठी कमाल ३३ वर्षे, व मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल ३८ वर्षे अशी राहील. तसेच सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांजकडील शासन निर्णय क्र. पअंक-१००९/प्र.क्र.२००/ २००९/१६-अ, दि.२७/१०/२००९ नुसार अशंकालीन उमेदवारांसाठी कमाल ४६ वर्षे असावे.

१) जनगणना (सन १९९१ ची) उमेदवारांसाठी कार्यालयातील सलग सेवेचा कालावधी अधिक ५ वर्षे शिथील केली जाईल. त्याबाबत अर्जदार / उमेदवार यांनी शासन निर्णय क्र. १०९७/प्र.क्र.७७/९७१६-अ, दि.१२/३/१९९८ मधील निकष पुर्ण केलेले असावे.

२) सामान्य प्रशासन विभाग यांजकडील शुध्दीपत्रक दि. २०/८/२०१० अन्वये माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील वर्ग ३ व वर्ग ४ मधील पदासाठी नेमणुकीकरीता विहीत वयोमर्यादेतील सुट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतकी राहील.

शासन निर्णयानुसार जाहीरात प्रसिध्द केल्याच्या दिनांकाचे दिवशी उमेदवाराचे वय उपरोक्त मर्यादेमध्ये असणे आवश्यक आहे.

**ब) शैक्षणिक अर्हता :-**

**१) लिपीक टंकलेखक पदासाठी :-**

i) किमान अर्हता माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (एस.एस.सी.) उत्तीर्ण.

ii) टंकलेखनाची शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र मराठी कमीत कमी ३० शब्द प्रती मिनीट किंवा इंग्रजी ४० शब्द प्रती मिनीट परीक्षा उत्तीर्ण असलेले शासन मान्य व्यावसायिक संस्थेचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

iii) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. निवक-१०१०/प्र.क्र.०८/२०१०/१६-अ, दि. ६/१०/२०१० अन्वये प्रकल्पग्रस्त, भूंकपग्रस्त, स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, सन १९९१ चे जनगणना कर्मचारी, सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी व पदवीधर/ पदविकाधारक अंशकालीन कर्मचारी या सर्व घटकातील उमेदवारांना जर त्यांना लिपीक-टंकलेखक पदावर नियुक्ती मिळाली, तर टंकलेखनाची परिक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून ६ महिने इतक्या कालावधीची मुदत देण्यात येत आहे.

iv) संगणक अर्हता पात्र प्रमाणपत्र (अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A किंवा B किंवा C स्तर यापैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र किंवा (ब) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र नियुक्तीनंतर विहीत मुदतीत सादर करणे आवश्यक राहील. नसल्यास शासन निर्णय सा.प्र.वि.क्र. प्रशिक्षण २०००/प्रकरण -६१/२००१/३९, दि.१९/३/२००३ अन्वये संगणकाची अर्हता नियुक्तीच्या दिनांकापासून २ (दोन) वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील.

iv) माध्यमिक शालांत परिक्षेत मराठी / हिंदी विषयाचा समावेश नसल्यास, निवड झालेल्या उमेदवारांना एतदर्थ मंडळाची मराठी /हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

**२) वाहनचालक पदासाठी :-**

i) उमेदवार इयत्ता ४ थी उत्तीर्ण असावा.

ii) उमेदवारास मराठी व हिंदी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

iii) मोटार वाहन कायदा १९८८ नूसार उमेदवार हा सक्षम प्राधिकाऱ्याकडील हलके अथवा जड वाहन परवाना धारक असणे आवश्यक आहे. मोटार वाहन चालविण्याचा किमान ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

iv) मोटार वाहन दुरुस्तीचे जुजबी ज्ञान असणे आवश्यक आहे.

v) उमेदवारास पुणे जिल्ह्याची भौगोलिक माहिती असणे आवश्यक आहे.

**३) शिपाई पदासाठी :-**

i) उमेदवार प्राथमिक शाळेची चौथी इयत्ता उत्तीर्ण असावा.

ii) उमेदवारास मराठी व हिंदी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

**-: परिक्षेचे स्वरुप :-**

| अ.क्र. | संवर्ग | परीक्षेसाठी गुण | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | लेखी परीक्षा | व्यावसायिक चाचणी | मौखिक परीक्षा | एकूण गुण |
| १ | लिपीक | २०० | - | - | २०० |
| २ | वाहनचालक | ५० | ४० | १० | १०० |
| ३ | शिपाई | ७५ | - | २५ | १०० |

१) लिपीक-टंकलेखक संवर्गातील पात्र उमदेवारांना शासन निर्णय दि.१९/१०/२००७ नुसार परिक्षेचा दर्जा कमीत कमी अर्हता माध्यमिक शालांत परीक्षा (इयत्ता १० वी) आहे अशा पदांकरीता परिक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परिक्षेच्या दर्जाच्या समान असेल व लेखी परिक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयांवरील प्रश्नांकरीता प्रत्येकी ५० गुण ठेवून एकूण २०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.

२) शासन निर्णय दि. १९/१०/२००७ नुसार लिपीक-टंकलेखक या पदाकरीता मौखिक परीक्षा घेण्यात येणार नसून फक्त लेखी परिक्षेच्या गुणांच्या आधारे मेरिट यादी/ गुणवत्ता यादी तयार केली जाईल.

३) वाहनचालक संवर्गातील पात्र उमदेवारांना शासन निर्णय दि.१९/१०/२००७ नुसार उमेदवारांची प्रथम ५० गुणांची लेखी परिक्षा घेण्यात येईल. लेखी परिक्षेमध्ये पात्र झालेल्या उमेदवारांची व्यावसायिक चाचणी ४० गुणांची घेण्यात येईल. व्यावसायिक चाचणीमध्ये पात्र झालेल्या उमेदवारांची मौखिक चाचणी १० गुणांची घेण्यात येईल.

४) शिपाई पदाकरीता लेखी परीक्षेतील गुणवत्तेनुसार व कागदपत्रांची तपासणी झाल्यानंतर पात्र उमेदवारांची २५ गुणांची मौखिक परीक्षा घेण्यात येईल. लेखी व मौखिक परीक्षेचे गुण एकत्रित करुन गुणानुक्रमानुसार अंतिम गुणवत्तायादी तयार केली जाईल.

५) दि.१९/१०/२००७ चे शासन निर्णयात निश्चित केलेल्या प्रमाणानुसार शिपाई संवर्गातील भरावयाची पदांबाबतीत लेखी परीक्षेतील गुण विचारात घेऊन पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी/ मौखिक परीक्षेसाठी बोलविण्यात येईल.

६) शिपाई व वाहनचालक पदासाठी असलेल्या मौखिक परिक्षेस उमेदवार गैरहजर राहिल्यास उमेदवाराची निवड करण्यात येणार नाही.

**-: अटी व शर्ती :-**

१. (i) शासन निर्णय क्र. रिपभ/प्र.क्र.६६/२०११/ई-१० दि. २७ जुन २०११ नुसार ज्या परिक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध नसल्यास त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला (Birth Certificate) सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणांत अधिवास प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही.

(ii) सदर परिक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या परिक्षार्थीने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या परिक्षार्थीचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे. अशा प्रकरणांतदेखील अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही.

(iii) उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या परिक्षार्थीसाठी लागू राहतील. इतर परिक्षार्थी / उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.

२. उमेदवाराने अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे परीक्षेला बोलावण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

३. प्राथमिक छाननीअंती ज्या उमेदवारांचे अर्ज नाकारण्यात आलेले नाहीत, अशा उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी तात्पुरता प्रवेश दिला जाईल.

४. आरक्षित मागास प्रवर्गाचा दावा करणाऱ्या उमेदवारांना त्या संदर्भातील सक्षम अधिकाऱ्यांने दिलेले जात प्रमाणपत्र (Caste Certificate) व उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्राची (Caste Validity Certificate) साक्षांकित प्रती निवडअंती सादर करणे आवश्यक आहे.

५. जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र. बीसीसी-२०११/प्र.क्र.-१०६४/२०११/१६-ब, दि.१२/१२/२०११ मधील तरतुदीनुसार याचिका क्र.२१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिनांक २५/८/२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी मधील आदेशाच्या अधीन राहून, तात्पुरती नियुक्ती आदेश निर्गमित केल्याचा दिनांकापासून ६ महिन्यांचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा त्यांची नियुक्ती पुर्व लक्षीप्रभावाने रद्द करणेत येईल.

६. उमेदवारांना लेखी परीक्षा, व्यावसायीक चाचणी व मुलाखतीसाठी स्वखर्चाने यावे लागेल.

७. लेखी परीक्षा पुणे शहरातील कोणत्याही परीक्षा केद्रांवर घेणेत येईल.

८. एखाद्या अर्जदाराने त्याची निवड करणेसाठी निवड समिती वरील अध्यक्ष, सदस्य तसेच अधिकाऱ्यांवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष राजकीय अथवा अन्य प्रकाराने दबाव आणल्यास अथवा गैर प्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून अपात्र ठरविणेत येईल.

९. लेखी परिक्षेमध्ये फक्त काळया शाईच्या बॉलपेनचा वापर करणे बंधनकारक आहे.

१०. उमेदवाराने एकुण गुणांच्या किमान ४५% गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.

११. शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र.एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६अ दि.१६/३/९९ अन्वये समांतर आरक्षणातील प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध झाले नाही तर समांतर आरक्षणातील त्या-त्या प्रवर्गातील उमेदवारांना उपलब्धतेनुसार पर्याप्त संख्येत यादीतील शेवटचे उमेदवार वगळून समाविष्ठ करण्यात येतील.

१२. नियुक्ती होणाऱ्या उमेदवारास शासन निर्णय दिनांक १/११/२००५ नुसार लागु करण्यात आलेली परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना (Contributory Fund) लागु राहील.

१३. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रशासन २०००/प्र.क्र.-५/२००१/३२ दि.२०/०७/२००२ व दि. १९/०३/२००३ अन्वये उपरोक्त पदाकरीता अर्ज करणा-या उमेदवारांपैकी निवड झालेल्या उमेदवारांनी संगणक हाताळणी /वापराबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकाचे दिवासापासून २ वर्षाचे आत सादर करणे आवश्यक राहील.

१४. एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण मिळाल्यास सामान्य प्रशासन विभाग यांजकडील शासन निर्णय क्र.प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, दि.२७/६/२००८ मधील निर्णयामध्ये नमुद केल्यानुसार प्राधान्यक्रमाच्या आधारे उमेदवाराची अंतिम निवड केली जाईल.

१५. अंतिम निवडयादी व प्रतिक्षायादी मधील निवड झालेल्या उमेदवारांनी पात्रतेबाबत सादर करावयाची कागदपत्रे.

i) पदवीधर अंशकालीन, माजी सैनिक या समांतर आरक्षण प्रवर्गातून अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी त्या समांतर आरक्षण प्रवर्गात मोडत असलेबाबतचे सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

ii) सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील पत्र क्रमांक पअंक-१०१०/७१७/प्र.क्र.३२२/१०/१६अ दिनांक २६ ऑगस्ट २०१० पत्रान्वये एकदा नोकरी मिळाल्यांनतर पुन्हा दुसऱ्या पदावर नोकरी मिळविण्यासाठी त्यास समांतर आरक्षणाचा लाभ देणे हे शासन धोरणाशी विसंगत आहे. एकदा उमदेवाराने समांतर आरक्षणाचा लाभ घेतला असल्यास त्या उमेदवारांस पुन्हा समांतर आरक्षणाचा लाभ देता येणार नाही. त्यानुसार आरक्षणाचा लाभ घेतलेला नाही किंवा घेणार नाही याबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक राहील.

iii) महिला आरक्षण हे शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग ८२/२००१ म.से.आ.-२०००/प्र.क्र.४१५/का-२, दिनांक २५/५/२००१ मधील तरतुदीनुसार राहील. खुल्या प्रवर्गातील महिलांना उन्नत व प्रगत व्यक्ती व गट यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे दिनांक ३१/३/२०१३ या दिनांकापर्यंत वैध असलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे.

iv) सामान्य प्रशासन विभाग शासन अधिसूचना क्र. एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०१०/१२ दि.२८/३/२००५ व शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२ दि.१/७/२००५ तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान मुलांचे प्रतिज्ञापन) नियम २००५ अन्वये दि. २८/३/२००५ नुसार रोजी हयात असलेली व त्यानंतर जन्माला आलेली अपत्यांची संख्या बाबत लहान कुटूंब असल्याचे विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच अविवाहीत असणाऱ्या उमेदवारानेही विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

v) शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव, अधिवास दाखला (Domicile Certificate) तसेच जातीचा दाखला, उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र, अ.ज./अ.जा.उमेदवार/ अर्जदार वगळून इतरांसाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसलेबाबत (Non-Cremy-layer Certificate) इत्यादी प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती सादर करणे आवश्यक आहे. साक्षांकित प्रती केद्र / राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी, पोस्ट मास्टर, मुख्याध्यापक व याबाबत प्राधिकृत व सक्षम अधिकाऱ्यांनीच केलेले असावे. तसे नसल्यास किंवा चुकीची माहिती असल्यास आपली निवड रद्द समजणेत येईल.

vi) शासनाचे महिला व बालविकास विभागाकडील निर्णय क्र. ८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/ का.२ दि. २५/०५/२००१ अन्वये खुला, वि.जा.अ., भ.ज.ब., भ.ज.क., भ.ज.ड., वि.मा.प्र. व इ.मा.व. या प्रवर्गातील महिला उमेदवारांना राखीव पदांसाठी निवड झाल्यास करावयाचा असल्यास त्यांनी दिनांक ३१/३/२०१४ या दिनांकापर्यंत वैध असलेला नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे.

vii) वि.जा.अ., भ.ज.ब., भ.ज.क., भ.ज.ड., वि.मा.प्र. व इ.मा.व. या प्रवर्गातील उमेदवारांना सक्षम अधिकाऱ्याचे जात व दिनांक ३१/३/२०१४ या दिनांकापर्यंत वैध असलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे.

viii) उमेदवार माजी सैनिक असल्यास त्यांनी जिल्हा सैनिक बोर्डात नावनोंदणी केली असल्यास प्रमाणपत्राची सांक्षाकित प्रत सादर करणे आवश्यक आहे.

१६. अंतरिम निवड यादीमधील पात्र उमेदवारांनी सादर केलेल्या विविध प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती मुळ प्रमाणपत्राच्या आधारे कागदपत्र तपासणीच्या वेळी तपासण्यात येईल. सदर प्रमाणपत्राच्या मुळ प्रती (Original Copy) कागदपत्रे तपासणीच्या वेळी उपलब्ध करुन देणे उमेदवारांवर बंधनकारक राहील. त्यामधील प्रमाणपत्रे खोटी किंवा चुकीची आढळल्यास संबंधित उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल.

**१७.** उमेदवाराने लेखी परिक्षेत मिळालेल्या एकत्रित गुणांच्या आधारे व त्या उमेदवाराची कागदपत्रे वैध ठरल्यास अंतिम निवडयादी तयार केली जाईल. अंतरिम निवडयादी मधून पदांच्या आरक्षणानुसार व पदांच्या उपलब्धतेनुसार उमेदवारांची अंतिम निवड यादी तयार केली जाईल.

१८. अंतिम निवड यादी / प्रतिक्षायादीतील पात्र उमेदवारांनी शासकीय सेवेत रुजु होण्यापुर्वी किमान ३ वर्षे सेवेत राहण्याबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक राहील.

**-: ऑनलाईन अर्ज करावयाची कार्य पध्दती व इतर सुचना :-**

१. जाहिरात काळजीपुर्वक वाचावी.

२. ऑनलाईन अर्ज MKCL च्या http://oasis.mkcl.org/jdr या संकेत स्थळावर उपलब्ध राहिल.

३. ज्या पदासाठी उमेदवार ऑनलाईन अर्ज भरणार आहे त्या पदाची पात्रता जाहिरातीमध्ये काळजीपुर्वक वाचावी. लहान कुटूंब असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्राचा नमुना सदर संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

४. उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतेवेळी सर्व आवश्यक कागदपत्रे व स्वतःचा अलीकडील काळातील पासपोर्ट फोटो स्वतःजवळ असल्याची खात्री करावी. अर्ज भरतेवळी फोटो, सही स्कॅन करुन अपलोड करावी.

५. ऑनलाईन अर्ज करणेसाठी उपरोक्त संकेत स्थळावर Apply Online या लिंक (Link) वर क्लिक करुन अर्ज भरणेस सुरुवात करावी.

६. ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे ते पद निवडा, एक-एक करत आपणांस ऑनलाईन विचारालेल्या प्रश्नांचे उत्तरासाठी योग्य पर्याय निवडा. संगणक प्रणाली तुम्ही दिलेल्या उत्तरांच्या आधारे तुमची प्राथमिक पात्रता तपासेल.

७. जर प्राथमिक पात्रता चाचणीत आपण पात्र असाल, ज्या पदासाठी अर्ज भरावयाचा आहे ते पद निवड आणि आवश्यक माहिती भरा.

८. आवश्यक माहिती भरल्यानंतर संगणक प्रणालीत तुमचा लॉगीन (Login) आयडी (ID) आणि पासवर्ड (Password) निर्माण करुन तुम्हाला तुमच्या स्क्रिनवर दाखवेल. आणि तुम्ही पुरविलेला भ्रमणध्वनी क्रमांकावर एसएमएस (SMS) करेल. **(कृपया आपला भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक अचुक टाकावा.)** तुमचा लॉग इन आयडी म्हणजेच तुमचा अर्ज क्रमांक असले याची नोंद घ्यावी.

९. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, पुणे/कौशल्यविकास या कार्यालयात व आदिवासी विकास विभागाकडे नावनोंदणी केली असलीतरी वरील पदासाठी रितसर ऑनलाईन अर्ज MKCL च्या संकेतस्थळावर जाऊन भरणे आवश्यक आहे. उमेदवारांनी अर्जासोबत माहिती सादर करताना सतत कार्यान्वित असलेला भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक व ई-मेल आयडी नमुद करावा जेणेकरुन आपणांस संपर्क करुन आवश्यक ती माहिती देणे सुलभ होईल.

१०. तदनंतर उमेदवाराने प्रिंट चलन (print challan) या लिंकवर क्लिक करुन चलन प्रिंट करावे या प्रिंट केलेल्या चलनावर नमूद केलेली फी केवळ स्टेट बँक ऑफ इंडिया (State Bank of India) कोणत्याही शाखेमध्ये कार्यालयीन कामाकाजाच्या विशी तसेच खाली दिलेल्या वेळा पत्रकात नमुद केलेल्या मुदतीच्या आत भरणे आवश्यक आहे. व त्याची एक प्रत उमेदवाराने स्वत:कडे जपून ठेवणे आवश्यक आहे.

११. अर्जाचे वेळापत्रक :-

| अ.क्र. | तपशील | कालावधी दिनांक | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| १ | ऑनलाईन अर्ज करण्याचा कालावधी | ०७/१२/२०१३ | २३/१२/२०१३ |
| २ | संगणकीय चलनाद्वारे स्टेट बँक ऑफ इंडिया च्या शाखांमध्ये फी स्विकृतीचा कालावधी | ८/१२/२०१३ | २६/१२/२०१३ |
| ३ | ज्यांचे अर्ज दि. २३/१२/२०१३ रोजी दाखल झाले आहेत व ज्या उमेदवारांनी बँकेमध्ये दि. २६/१२/२०१३ पर्यंत भरती प्रक्रिया शुल्क जमा केले असेल त्यांच्यासाठी उरलेला ऑनलाईन अर्ज भरण्याचा कालावधी | २९/१२/२०१३ | |

१२. माहिती भरल्यानंतर उमेदवाराने अर्जाची प्रिंट स्वत: काढून पुढील भरती प्रक्रियेसाठी आपल्या माहितीसाठी जतन करुन ठेवावी. अर्जदाराने नियमितपणे वेबसाईट्सला भेट द्यावी. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर अर्जाची प्रत प्रिंट काढून सह जिल्हा निबंधक, पुणे शहर कार्यालय पुणे किंवा MKCL ला पाठविण्याची आवश्यकता नाही.

१३. पदासाठी असणारी किमान अर्हता आणि पात्रता धारण करणाऱ्या व लेखी परिक्षेस पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना या पदासाठी घेण्यात येणारी परिक्षेची रुपरेषा, वेळापत्रक, प्रवेशपत्र, परिक्षा केंद्र, बैठक क्रमांक इ.बाबत माहिती MKCL च्या अधिकृत वेबसाईटवर उपलब्ध राहील.

१४. ज्या उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे आणि आवश्यक आवेदन शुल्क मुदतीत अदा केले आहे व संपूर्ण माहिती भरुन प्रिंट काढलेली आहे त्यांना लेखी परिक्षेचे प्रवेशपत्र (हॉल तिकीट) त्यांच्या लॉगीन आयडीद्वारे MKCL च्या वरील नमुद संकेत स्थळावरुन डाऊनलोड करता येईल. यासाठी वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१५. परिक्षाकेंद्रावर ओळखपत्रासह परिक्षा सुरु होणेपुर्वी एक तास अगोदर उपस्थित राहणे आवश्यक आहे. उशिरा येणाऱ्या व प्रवेशपत्र न आणणाऱ्या उमेदवारांना परिक्षेकरीता प्रवेश दिला जाणार नाही, तसेच उमेदवारांनी स्वत:चे फोटो असलेले ओळखपत्र उदा. वाहन परवाना, पॅनकार्ड, निवडणुक ओळखपत्र इ. सोबत आणणे बंधनकारक राहील.

१६. उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरण्याबाबत काही अडचणी आल्यास त्यांनी **९३२६५५२५२५** या क्रमांकावर संपर्क साधावा.

१७. अर्जामध्ये नमूद केलेली माहिती चुकीची अथवा खोटी आढळून आल्यास संबंधित उमेदवार दंडात्मक कारवाईस पात्र राहील. तसेच चुकीच्या माहितीच्या आधारे नियुक्ती झ ााल्यास तात्काळ सेवेतून काढून टाकणेस पात्र राहील. व भा.दं.वि.संहिताचे कलम १९९ व २०० (२) प्रमाणे कारवाईस पात्र राहील.

१८. लिपीक-टंकलेखक, वाहनचालक व शिपाई भरती परिक्षेचा दिनांक व वेळ कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे.

अ) लेखी परीक्षेचा दिनांक :- दिनांक.१९/१/२०१४.

१)लिपीक-टंलकेखक पदासाठी :- वेळ सकाळी - ११.०० ते दुपारी १.०० पोवेतो.

२) वाहनचालक व शिपाई पदासाठी :- वेळ सकाळी - ११.०० ते दुपारी १२.०० पावेतो.

१९. परीक्षा शुल्क :-

सदर भरतीप्रक्रियेत खालीलप्रमाणे परीक्षा शुल्क आकारले जाणार असून सदर परीक्षा शुल्क हे ना परतावा राहील.

१) खुला प्रवर्ग :- रुपये ५००/- (अक्षरी पाचशे रुपये फक्त)

२) मागास प्रवर्ग :- रुपये ३००/- (अक्षरी तीनशे रुपये फक्त)

३) माजी सैनिक :- परीक्षा शुल्क नाही. तथापि त्यासाठी त्यांनी सैनिकी सेवेचा पदावधी पुर्ण केलेबाबतच्या कार्यमुक्त पत्राची साक्षांकित प्रत स्कॅन करुन ऑन लाईन अपलोड करणे बंधनकारक आहे. सदर कार्यमुक्त पत्राची प्रत सादर न केलेस वर नमुद केलेप्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक राहिल.

(अधिक माहिती मिळण्याचे ठिकाण (MKCL Website- संकेतस्थळ) http://oasis.mkcl.org/jdr ही वेबसाईट दि.०७/१२/२०१३ पासून कार्यरत होईल.)

**(निलीमा धायगुडे)**
**सदस्य सचिव**
**तथा सह जिल्हा निबंधक वर्ग-१**
**पुणे शहर, पुणे**

**स्वाक्षरीत/-(विकास देशमुख)**
**अध्यक्ष, जिल्हा निवड समिती**
**तथा जिल्हाधिकारी, पुणे.**